परिपत्रक क्र.११

क्र.उसं/कमाधो/कोळसा वितरण धोरण/२००८/बी-६७८७
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १५ फेब्रुवारी, २००८.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील लघु व मध्यम उद्योग घटकांना कोळसा पुरवठा करण्याबाबत...

संदर्भ :- १) भारत सरकारचे कोळसा मंत्रालयाचे दिनांक १८/१०/२००७ चे परिपत्रक.
२) उद्योग, ऊर्जा व कामकार विभागाचे दिनांक ०८/०२/२००८ चे पत्र.
३) मुख्यालयाचे दिनांक ०५/०१/२००२ चे व दिनांक २४/०७/२००२ चे परिपत्रक

भारत सरकारने दिनांक १८/१०/२००७ च्या कार्यालयीन आदेशान्वयें औद्योगिक कारणास्तव कोळसा वितरणाचे नवीन धोरण निर्गमित केले आहे. त्या अंतर्गत सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना लागणा-या कोळशाच्या वितरणाबाबत सुस्पष्ट निकष ठरवून दिले आहेत. या धोरणाची प्रत यासोबत आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. या धोरणा अंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीनुसार आजतागायत लघु उद्योगांना प्रत्येकी ५०० मेट्रीक टन प्रतिवर्षी कमाल कोळशाचे वितरण करण्यात येत होते. त्या परिमाणात बदल करुन आता प्रति घटकास ४२०० मेट्रीक टन पर्यंत प्रतिवर्षी कोळसा वितरण करण्याचे ठरविले आहे. राज्यातील लघु व मध्यम उद्योग घटकांना कोल इंडिया लिमिटेड कडून उपलब्ध होणा-या कोळशाचा पुरवठा करण्यासाठी स्टेट नॉमिनेशन एजन्सी म्हणून महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची नियुक्ती करण्यात आलेली असून त्याप्रमाणे शासन स्तरावरुन केंद्र शासनाला स्वतंत्रपणे कळविण्यात आलेले आहे (प्रत सोबत जोडली आहे.)

२. राज्यातील लघु व मध्यम उद्योग घटकांची तपासणी करुन, घटकाला खरोखर आवश्यक असलेल्या कोळशाच्या मागणीची शिफारस महामंडळाकडे करणे व कोळशाचा योग्य वापर होतो की नाही याची तपासणी करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे ही कामे उद्योग संचालनालया अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्र व मुंबईकरिता सह संचालक (उद्योग), मुंबई प्राधिकरण विभाग यांचे मार्फत करण्याचे निश्चित झाले आहे. वरीलप्रमाणे उद्योग संचालनालयास या धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने दिनांक ०८/०२/२००८ च्या पत्रान्वयें कळविले आहे.

३. राज्यातील लघु व मध्यम उद्योग घटकांना लागणा-या कोळशाचे मूल्यमापन **(assessment)** मुख्यालयाने आजतागायत वेळोवेळी ठरवून दिलेल्या विद्यमान विहीत पध्दतीनुसार व (विहीत नमुन्यातील अर्ज, शपथपत्र व इतर संबंधित कागदपत्रे घेऊन) धोरणाअंतर्गत अतिशय काटेकोरपणे करुन प्रत्येक घटकाची लागणा-या कोळशाची आवश्यक ती छाननी करुन जिल्ह्यातील घटकांस लागणा-या किमान कोळशाच्या गरजेची शिफारस एकत्रितपणे दिनांक २० मार्च २००८ या तारखेपर्यंत महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडे परस्पर करावी व मुख्यालयास तसे अवगत करावे. याबाबतीत दरमहा मुख्यालयास अहवाल सादर करावा. याबाबत स्थानिक वृत्तपत्रातुन जाहिरात देवून जास्तीत जास्त प्रसिद्धी द्यावी व आपल्या जिल्हयातील औद्योगिक संघटनांना अवगत करण्यांत यावे. तसेच कार्यालयातील नोटीस बोर्डवर व कार्यालयीन संकेत स्थळावर माहिती उपलब्ध करुन द्यावी.

४.	चालू वर्षातील राज्यातील लघु उद्योगांची कोळशाची आवश्यकता व गरज याबाबतची छाननी व मूल्यमापन **(assessment)** महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने केले असल्याचे कळविले आहे. त्यामुळे या वर्षात जिल्हा उद्योग केंद्र व मुंबई प्राधिकरण विभाग या कार्यालयाने केवळ मध्यम औद्योगिक घटकाच्या बाबतीतच ही कार्यवाही करावयाची आहे. कोळसा वितरणाबाबत प्रगतीचा आढावा राज्य शासन व केंद्र सरकार यांना वेळोवेळी सादर करावयाचा असल्याने व वितरणाच्या गुणवत्ते बाबतीत केंद्र सरकार वेळोवेळी तपासणी करणार असल्याने या कामी सर्व प्रकारची सावधगिरी व वैयक्तिक कौशल्य वापरुन अतिशय काटेकोरपणे कर्तव्यपालन करणे आवश्यक आहे. ज्या लघु व मध्यम उद्योगाच्या बाबतीत लागणा-या कोळशाचे मूल्यमापन करुन शिफारस करण्यात येत आहे अशा घटकांच्या बाबतीत सर्व समावेशक माहिती असलेला तक्ता शासनाच्या विद्यमान संकेत स्थळावर उपलब्ध करुन द्यावा. आपल्या कार्यालयातर्फे दिनांक ३१/०३/२००८ पर्यंत मध्यम औद्योगिक घटकाची कोळशाची लागणारी आवश्यक ती शिफारस करुन सदर माहिती शासनाच्या विद्यमान संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यांत यावी. या कामी अपहार व गैरवापर टाळण्यासाठी व योग्य ती पारदर्शकता पाळण्याबाबत सर्व कार्यालयांनी खबरदारी घेवून चोखपणे कार्यवाही करावी.

५.	तसेच शासनाच्या पत्रामध्ये उल्लेख केल्यानुसार औद्योगिक घटकांना वाटप करण्यात येणा-या कोळशाबाबत योग्य तो विनियोग **(utilisation / evaluation)** व त्यावरील नियंत्रण याबाबतचे संनियंत्रण करणे ही महत्त्वाची जबाबदारी आपणावर सोपविण्यात येत आहे. याबाबत आपल्या स्तरावरुन योग्य ती कार्यवाही वेळोवेळी करण्यात यावी व याबाबतचा मुख्यालयाने विहित केलेल्या नमुन्यात अहवाल संचालनालयास वेळोवेळी पाठविण्यात यावा.

कृपया या परिपत्रकाची पोच पाठवावी.

मा. वि. [signature] 15/2/08

( मालिनी वि. शंकर )
विकास आयुक्त (उद्योग)

प्रति,

१) अधिक्षकीय उद्योग अधिकारी / महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (सर्व).
२) उद्योग सह संचालक (सर्व)

प्रत माहितीस्तव :-

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई.
२) उप सचिव (उद्योग-१०), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

११/१

# महाराष्ट्र शासन

क्र.कोळसा-२००८/(प्र.क्र.१६०३)/उद्योग-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०८ फेब्रुवारी २००८

प्रति,

विकास आयुक्त (उद्योग),
उद्योग संचालनालय,
मुंबई.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील लघु व मध्यम उद्योग घटकांना कोळसा पुरवठा करण्याबाबत.

महोदय,

कोळसा मंत्रालय, भारत सरकार, यांनी दिनांक १८/१०/२००७ च्या आदेशान्वये कोळसा वितरणाबाबतचे नवीन धोरण अमलात आणले आहे. या धोरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील लघु व मध्यम उद्योग घटकांना कोल इंडिया लि. कडून उपलब्ध होणाऱ्या कोळशाचा पुरवठा करण्यासाठी स्टेट नॉमिनेशन एजन्सी म्हणून महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

२. यासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, राज्यातील लघु व मध्यम उद्योग घटकांची तपासणी करुन, घटकाला खरोखर आवश्यक असलेल्या कोळशाच्या मागणीची शिफारस महामंडळाकडे करणे व कोळशाचा योग्य वापर होतो की नाही याची तपासणी करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे ही कामे उद्योग संचालनालया अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्र यांचे मार्फत करण्यात यावे व जिल्ह्यातील उद्योग घटकांची तपासणी करुन घटकाला खरोखर आवश्यक असलेल्याच कोळशाच्या मागणीची शिफारस महामंडळाकडे जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत करण्यात यावी. त्यानुसार उद्योग संचालनालया अंतर्गत सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र व मुंबई करिता सह संचालक (उद्योग), मुंप्रावि यांना योग्य ते आदेश देण्यात यावेत.

३. तसेच, महामंडळाला उद्योग घटकाकडून प्राप्त झालेली एकूण २१,९४,७०६ मेट्रीक टन कोळशाची मागणी केंद्र शासनाला / कोल इंडिया लि. ला कळविण्यात आलेली आहे. तथापि, उद्योग संचालनालयाने महामंडळाशी संपर्क साधून विस्तृत माहिती विवरणपत्रान्वये केंद्र शासनास / कोल इंडिया लि. यांना तात्काळ पाठविण्या संदर्भात कार्यवाही करावी.

DUI(I), 'A' What is the current practice? Is it the quantity basis for evaluation? OSD(RM) DD(RM) 8/2/08

आपला विश्वासू,

(वि.वा. बोभाटे)
शासनाचे उप सचिव

प्रत माहितीसाठी :-

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई.

[illegible] G-982 08/2/08 11/2 DD(RMP)-28 11/02/08